भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र .८१०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ११/१२/२०१७

## १) मोबाईल शॉपी दुकानातील मोबाईलची चोरी:—

दिनांक ०९/१२/२०१७ चे २१.०० ते ०६.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादीचे सुरेंद्र नमोहर निपाने वय २८ वर्ष रा. राममंदीर वार्ड चांदणी चौक भंडारा, यांचे बालाजी मोबाईल शॉपी दुकानाचे शटरचे ताले कोणीतरी अज्ञात चोराने तोडुन दुकानातील नोकीया कंपनी चे २ मोबाईल कि. १९,००/रु. लोकल कंपनीचे ९ मोबाईल कि. ८,०००/रु. हेड फोन १० नग कि. १०००/रु. व नगदी २,०००/रु. असा एकुन १२,९००/रु. चा माल चोरून नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा कलम ४६१,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा.शेन्डे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत

## २) टाटा इंडीका वाहनाला धडक देवुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद:—

दिनांक ०९/१२/२०१७ चे २१.१५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी रामकिसन दुलीचंद लांजेवार वय ४३ वर्ष रा. साखरी टोला पो.स्टे. सालेकसा जि.गोंदीया हा त्यांचे ताब्यातील वाहन टाटा इंडीका कार क्र. एमएच ३५ पी. २३६१ ने नागपुर कडुन भंडारा कडे येत असता, महर्षी विदयालय जवळ एनएच ०६ रोड येथे त्याचे मागेहुन येणाऱ्या आरोपी ट्रक चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक हयगयीने चालवुन फिर्यादीचे टाटा इंडीका ला धडक देवुन नुकसान केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा कलम २७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गदादे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत

## ३) क्षुल्लक कारणा वरून भांडण करून लाकडी दांडयाने डोक्यावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद:—

दिनांक १०/१२/२०१७ चे ०८.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीने आरोपीचे शेतात जावुन वखरणी करीता वखर मागीतला असता, वखर तुझ्या बापाचा आहे का? असे म्हणुन आरोपीने भांडण करून शिवीगाळ केली व वखरचा लाकडी दांडा फिर्यादीच्या डोक्यावर मारून जखमी केल्याने, फिर्यादी शुध्दोधन गजानन सेलोकर वय २९ वर्ष रा. दवडीपार यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४, ५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गायधने पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

## ५) गळफास लावुन महीलेचा मृत्यु :—

दिनांक १०/१२/२०१७ चे २०.१५ वाजता पुर्वी फिर्यादीची मृतक बहीन कु. मिलन ईश्वर चाहांदे वय ३९ वर्ष रा. लाला लजपतराय वार्ड भंडारा हीचे लग्न होत नसल्याने याचा तान तनावर घेवुन घराचे रूम मधील सिलींग फनला बॅडेज पट्टीने गळफास लावुन आत्महत्या केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे. भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. बोरकर पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) अवैध दारू/ जुगार अड्डयांवर धाडी . :–**

दिनांक १०/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन कारधा,वरठी गोबरवाही ,येथील अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २४ लिटर हातभट्टी दारू किंमती १७००/–रु. व जुगार कारधा असा एकुन २०५० /रु असा एकुन ३०, ७५०/रु. चा माल जप्त करण्यात आला.

**५) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक १०/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ७५ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवाशी ०१ तीन सिटर वाहनांवरती ०८ केसेस व ईतर वाहनांवरती ६६ केसेस करण्यात आलेले आहे.

**(एस. व्ही. कुलकर्णी )**
**पोलीस उपअधिक्षक (गृह)**
**भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.